2016.05/003.0009




# भरतशास्त्र मासिक

नाटक.
नाटकातली माणसं.
त्यांच्या आठवणी.
त्यांचे विचार.
त्यांच्या गप्पा.
त्यांच्या समस्या.
नाटक.
नाटक.
नाटक.

२८ लक्ष्मी बिल्डिंग,
चमारबाग क्रॉस लेन,
परळ, मुंबई ४०० ०१२

भरतशास्त्र

एक माही नाटकपत्र
सप्टेंबर १९८० तीन रुपये
वर्ष तिसरं : अंक पहिला

# संपादकीय

'भरतशास्त्र'चा पहिला अंक सप्टेंबर १९७८ मध्ये 'संकल्प' ह्या हौशी नाट्यसंस्थेने प्रकाशित केला. महाविद्यालयातल्या काही तरुणांनी एकत्र येऊन 'नाटकं' करण्याकरता 'संकल्प' सुरू केली. पण लवकरच फक्त 'नाटकं करणं' हे अपुरं वाटू लागलं.

आजूबाजूला नाट्यव्यापार अगदी यथास्थित चाललेला होता. नाटकं लिहीली जात होती, बसवली जात होती, सादर होत होती. प्रायोगिक नाटकांची छबिलदास चळवळही फोफावली होती. पण ह्या साऱ्यावर समाधानकारक, सुसंघटित चर्चा मात्र होत नव्हती. अशी चर्चा होणं आवश्यक होतं. फुटकळ परिसंवाद, व्याख्यानांनी काम भागण्यासारखं नव्हतं. त्याकरता केवळ 'नाटक' ह्या विषयाला पूर्णपणे वाहिलेल्या एखाद्या नियतकालिकाची गरज होती.

म्हणून 'भरतशास्त्र' ह्या धाडसी प्रयत्नाला सुरुवात झाली. होत असलेल्या नाटकांवर टीका व्हावी, उलटसुलट चर्चा व्हावी, नाटक हा केवळ एक वाङ्मयप्रकार नसून एक प्रयोग-सिद्ध कलाविष्कार असल्याकारणाने प्रयोगसमीक्षेला प्राधान्य मिळावं, नाटकाची विविध अंगं साक्षेपाने चर्चिली जावी, नाटकांमधल्या व्यक्ती आणि संस्थांचा परिचय व्हावा, त्यांच्या समस्या, त्याचे विचार समोर यावे, रंगभूमीचा इतिहास, संहिता आणि तंत्रातल्या वेगवेगळ्या प्रवाहांचा परिचय व्हावा, विश्लेषणात्मक, तौलनिक अभ्यास शक्य व्हावा—असं खूप काही वाटत होतं. हे सारं लगेच सिद्ध होणार नव्हतं. पण त्या दिशेने वाटचाल मात्र करण्याचा संकल्प केला होता. मार्ग अवघड होता, शक्ती क्षीण होती; पण ध्येयं स्पष्ट होती आणि इच्छा दुर्दम्य होती.

ही इच्छा 'भरतशास्त्र'शी तडक संबंध असलेल्यांचीच नाही. तर असंख्य वाचकमित्रांची, हितचिंतकांची, नाटकवेड्यांची. त्यांच्या सक्रीय पाठिंब्याशिवाय, सहाय्यशील सहानुभूतीखेरीज ही इतकी मार्गक्रमणा पुरी होणं शक्यच नव्हतं.

अशातऱ्हेच्या नियतकालिकांची निकड पूर्वीपासूनच भासत होती आणि ह्या तऱ्हेचे प्रयत्नही पुष्कळ झाले. रंगभूमी, नाटक, नांदी, परिक्षण, नाट्यभूमी अशी नावं चटकन् डोळ्यापुढे येतात. सध्या 'नाट्यदर्पण' नावाचं एक नाट्यविषयक मासिक चालू आहे. अर्थात् त्याचं स्वरूप 'भरतशास्त्र'पेक्षा वेगळं आहे. ही नियतकालिकं बंद व्हायला प्रमुख कारणं दोन : चांगल्या लेखकांचा तुटवडा आणि आर्थिक चणचण.

'भरतशास्त्र'ला सुद्धा ही समस्या जाचते आहेच. नाट्यविषयक चर्चेचं व्यासपीठ होण्या-करता 'भरतशास्त्र'ला आपल्या लेखनसहाय्याची गरज आहे. त्याचप्रमाणे वर्गणीदार आणि जाहिराती मिळवून देऊन 'भरतशास्त्र'ला आर्थिक सहाय्यही करावं अशी आम्ही विनंती करतो.

आपल्या सहकार्यामुळे आणि सदिच्छेमुळेच इथवर प्रवास झाला आहे. पुढची पावलं उचलत आहोत तीही तुमच्यावरच विश्वास ठेवून...